MHSO100000812015

# वि.दि.दा.क्र.०६/२०१५ मधील निशाणी क्र.१७८ खालील आदेश

वादींनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिताचे, क्रम–६ नियम १७ प्रमाणे मयत वादी क्र.१ रुक्मीणी पांडुरंग देशमुख हिचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे. त्यांनी सदरच्या अर्जात कथन केले आहे की, वादी क्र. १ ही ता.०१.०९.२०२५ रोजी मयत झाली असून तिला पांडुरंग आण्णसाहेब देशमुख, अनंत पांडुरंग देशमुख,गोविंद पांडुरंग देशमुख, रामचंद पांडुरंग देशमुख, मिरा प्रशांत माने–देशमुख व हेमलता विलास जगताप हे वारस आहेत. त्यामुळे त्यांची नावे दाव्यात वादी क्र.१ चे वारस म्हणुन समाविष्ट करण्यास व त्याबाबत दुरुस्ती करण्यास त्यांनी परवानगी मागितली आहे. सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुपात बदल होत नाही. म्हणून त्यांनी त्यांचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. सदरचे अर्जास प्रतिवादींनी जबाब दिलेला असून त्यामध्ये म्हटले आहे की, सदरचे अर्जास त्यांची हरकत असुन सदरचा अर्ज कायदेशीर नाही. त्यांनी पुढे कथन केले आहे की, वादींनी सदरचा दावा कराराचे विशिष्ट पालन करुन मिळण्यासाठी दाखल केला आहे. दावा मिळकत ही शेत मिळकत आहे. मयत वादी क्र. १ ला दावा मिळकतीमध्ये कोणताही हक्क नव्हता व नाही. त्यामुळे तिच्या पतीला वारस म्हणून सदरचे प्रकरणात अभिलेखावर घेता येणार नाही. त्यामुळे सदरचा अर्ज रद्द होण्यास पात्र आहे.

३. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्दयावर मी माझे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे काय? | ... | होय. |
| २. आदेश काय? | .. | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र. १ बाबत

४. मी वादींतर्फे विद्वान वकील श्री. नरुटे व प्रतिवादींतर्फे विद्वान वकील श्री. बर्गे यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच सदरच्या प्रकरणांमधील संबंधीत दस्तऐवज पाहिले. वादी क्र.१ ही ता.०१.०९.२०२५ रोजी मयत झाल्याचे दिसुन येते. मयत वादी क्र.१ हिचे वारस वर नमुद केल्याप्रमाणे असल्याचे दिसुन येते. वादी क्र. १ च्या वारसांना प्रतिवादींच्या विरुध्द सदरचा दावा चालविण्याचा अधिकार आहे. सदरचा दावा जरी कराराचे विशिष्ट पालन करुन मिळण्यासाठी दाखल करण्यात आला असता तरी वादी क्र. १ च्या पतीचा सुद्धा वारस म्हणुन दावा मिळकतीमधील त्याचे हितसंबंध संरक्षित करण्याचा त्याला अधिकार आहे. त्यामुळे वादी क्र.१ च्या वारसांची नावे दाव्यात समाविष्ट करण्यास परवानगी देणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर ''होकारार्थी'' नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. २ बाबत**

५. मी वर नमुद केल्याप्रमाणे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र. २ चे उत्तरासाठी खालील अंतिम आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

सदरचा निशाणी क्र.१७८ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by GHANWAT SOPAN DASHRATH
Date: 2025.10.17 11:37:19 +0530

दि.१५.१०.२०२५. (सो.द.घनवट)
दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,
माळशिरस.

**शेरा**

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | श्री.म.पां.सदाफुले. |
| कोर्टाचे नाव | – | दि. न्या. व. स्तर, माळशिरस. |
| न्यायनिर्णयाचा मजकूर सांगितल्याचा दिनांक | – | १५.१०.२०२५. |
| न्यायनिर्णय टंकलिखित केलेला दिनांक | – | १५.१०.२०२५. |
| न्यायनिर्णय स्वाक्षरीत केल्याचा दिनांक | – | १५.१०.२०२५. |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | – | १७.१०.२०२५. |

स्वाक्षरीत/–

दि.१७.१०.२०२५.

(श्री.म.पां.सदाफुले)
लघुलेखक ग्रेड – २,
दिवाणी न्यायालय, व. स्तर,
माळशिरस.